महाराष्ट्र शासन
संचालनालय, लेखा व कोषागारे,
"कस्तुरी बिल्डींग" तळ मजला, पेट्रोलियम हाऊस समोर, जे. टाटा मार्ग, चर्चगेट, मुंबई - ४०० ०२०.
दूरध्वनी क्र.०२२ २२८८०१०६ E Mail ID-dd.admin@mahakosh.in

क्र.संलेको/२३-२४/घरबा अग्रिम महाणखत परिपत्रक/१५२ दिनांक 12 MAR 2024

## परिपत्रक

विषय- घरबांधणी अग्रिम प्रदानानंतर आवश्यक कागदपत्रे संचालनालयास सादर करणेबाबत.

मुंबई वित्तिय नियम, १९५९ च्या परिशिष्ट २६ मधील नियम ६(७) नुसार तसेच, घरबांधणी अग्रिम मंजूरी आदेशासोबतच्या परिशिष्टात दिलेल्या महत्वाच्या सूचनांनुसार अग्रिमधारकांनी त्यांना अग्रिम प्राप्त झाल्यानंतर ३ महिन्यांचे आत आवश्यक असणारी खालील कागदपत्रे संचालनालयास सादर करणेबाबत निर्देशित करण्यात आलेले आहे.

१. मंजूर घरबांधणी अग्रिम रक्कमेचे उपयोगिता प्रमाणपत्र.
२. मंजूर केलेल्या घरबांधणी अग्रिमानुषंगे शासनाकडे घराचा विमा, विमा संचालनालय, महाराष्ट्र शासन, म्हाडा, बांद्रे (पुर्व), मुंबई - ४०००५१ यांचेकडे विमा उतरविलेली विमा पॉलीसी.
३. कर्जाच्या परतफेडीसाठी अग्रिम घेतले असल्याने संबंधित वित्तीय संस्थेचे / बँकेचे कर्ज शिल्लक नसल्याबाबतचे ना-बाकी प्रमाणपत्र. (परत फेड केल्याची शिल्लक रक्कम नमूद करण्यात यावी.)
४. मुंबई वित्तीय नियम, १९५९ च्या परिच्छेद २६ मधील विहित नमुन्यातील दुय्यम निबंधक यांचे कार्यालयात नोंदविलेल्या घराच्या नोंदणीकृत गहाणखताची स्वसाक्षांकीत छायाप्रत.
५. घरबांधणी अग्रिम मंजूरीबाबत सेवापुस्तकात नोंद घेतलेल्या पृष्ठाची सांक्षाकीत छायाप्रत.

तथापि, सोबत जोडलेल्या विवरणपत्रातील अग्रिमधारकांनी घरबांधणी अग्रिमाची रक्कम प्राप्त झाल्यावर तीन महिन्याचे आत सादर करावयाची कागदपत्रे संचालनालयास सादर केलेली नाही.

महाराष्ट्र शासन, वित्त विभाग, शासन निर्णय दि.२०.०२.२०१५ व दि.०२.०२.२०२१ मधील मुद्दा क्र.१४ मध्ये शासकीय अधिकारी / कर्मचाऱ्यांना मंजूर करण्यात आलेले अग्रिम ज्या प्रयोजनाकरिता मंजूर केले आहे, त्या कारणाकरिता त्याचा विनियोग न केल्यास किंवा अग्रिम व व्याज परतफेडीच्या संदर्भातील अटी व शर्तीचे पालन न केल्यास किंवा त्यात कोणत्याही प्रकारची कसूर झाल्यास कसुरदाराकडून अग्रिमाची रक्कम प्रचलित व्याजदर + २.७५ टक्के दंडनीय व्याज यासह एकरकमी वसूल करण्यात यावी, अशी तरतूद आहे.

घरबांधणी अग्रिमाची रक्कम प्राप्त झाल्यावर सादर करावयाची कागदपत्रे अग्रिमधारकांनी त्यांच्या नावासमोर अप्राप्त म्हणून नमूद केलेली कागदपत्रे सदर परिपत्रक प्रसिध्द झाल्याच्या दिनांकापासून ३ महिन्यांत संचालनालयास सादर करण्याची अंतिम संधी याव्दारे देण्यात येत आहे. याबाबत पूर्तता करण्यात न आल्यास विभाग प्रमुख व घरबांधणी अग्रिम मंजूरीबाबत सक्षम प्राधिकारी या नात्याने अग्रिमधारक कार्यरत असलेल्या कार्यालयातील आहरण व संवितरण अधिकाऱ्यांना अग्रिमधारकाकडून नियमानुसार मंजूरीच्या दिनांकापासून २.७५ टक्के दंडनीय व्याज वसूल करण्याचे आदेश देण्यात येतील आणि याची सर्वस्वी जबाबदारी अग्रिमधारकाची राहील.

तसेच, याव्दारे सर्व अग्रिमधारकांना सूचित करण्यात येते की, घरबांधणी अग्रिमाची रक्कम अदा केल्यापासून ३ महिन्यात आवश्यक कागदपत्रे संचालनालयास न चुकता सादर करावीत. जेणेकरून अशा प्रकारे दंडनीय व्याजासह वसूली करण्याची कारवाई टाळता येईल.

(दीपा देशपांडे)
संचालक, लेखा व कोषागारे,
महाराष्ट्र राज्य, मुंबई

| अ. क्र. | अग्रिमधारकाचे नाव / अग्रिम मंजूरी आदेशात नमूद पदनाम | मंजूर अग्रिम | प्रमाणक क्रमांक व दिनांक | उपयोगिता प्रमाणपत्र | वित्तिय संस्थेचे ना-देय प्रमाणपत्र | विमा पॉलिसी | गहाणखत |
|---|---|---|---|---|---|---|---|
| **घरबांधणी अग्रिम मंजूर झालेले अग्रिमधारक (२०१९-२०२०)** | | | | | | | |
| १ | श्री. विजयसिंग नवलसिंग राठोड, उपलेखापाल (पहिला हप्ता) | २१०००० | ३१-०५/११/२०१९ | अप्राप्त | अप्राप्त | अप्राप्त | अप्राप्त |
| २ | श्री. मनोज भगवानगिर गोस्वामी, उपसंचालक | २०२९००० | ३०-०५/११/२०१९ | अप्राप्त | प्राप्त | प्राप्त | प्राप्त |
| ३ | श्री. अतुल अंबादास गावडे, सहायक संचालक | ३९३१००० | ५२-२२/११/२०१९ | प्राप्त | प्राप्त | प्राप्त | अप्राप्त |
| **घरबांधणी अग्रिम मंजूर झालेले अग्रिमधारक (२०२०-२०२१)** | | | | | | | |
| १ | श्री. वसंत नारायण विरार, सहाय्यक लेखा अधिकारी | २०६३००० | ५७-२२.०३.२०२१ | अप्राप्त | अप्राप्त | अप्राप्त | अप्राप्त |
| २ | श्री. अतुल शिवा आकुर्डे, मुख्य लेखा अधिकारी | ७०००००० | १०५-३०.०३.२०२१ | प्राप्त | प्राप्त | प्राप्त | अप्राप्त |
| ३ | श्री. भालचंद्र प्रताप चव्हाण, सहाय्यक संचालक | ४७९१००० | ८७-३०.०३.२०२१ | प्राप्त | प्राप्त | प्राप्त | अप्राप्त |
| **घरबांधणी अग्रिम मंजूर झालेले अग्रिमधारक (२०२१-२०२२)** | | | | | | | |
| १ | श्री. अभिजीत राजेंद्र गायकवाड, उपलेखापाल | २२५०००० | १०-२२.०९.२०२१ | अप्राप्त | अप्राप्त | अप्राप्त | अप्राप्त |
| २ | श्री. धनाजी हणमंत शिंदे, कोषागार अधिकारी | ३७२१००० | २-०२.११.२०२१ | प्राप्त | प्राप्त | प्राप्त | अप्राप्त |
| **घरबांधणी अग्रिम मंजूर झालेले अग्रिमधारक (२०२२-२०२३)** | | | | | | | |
| १ | श्री. विजयकुमार बाबुराव राठोड, वरिष्ठ लिपिक | १०००००० | ०७-०४.१०.२०२३ | प्राप्त | निरंक | अप्राप्त | प्राप्त |
| २ | श्रीम. रमा विश्वनाथ जोशी, कनिष्ठ लेखापाल | १९०५५०० | २२-०८.०३.२०२३ | अप्राप्त | अप्राप्त | अप्राप्त | अप्राप्त |
| ३ | श्रीम. भाग्यश्री आण्णासाहेब पवार, सहाय्यक संचालक | ६९९८५०० | ६३-२३.०३.२०२३ | अप्राप्त | अप्राप्त | अप्राप्त | अप्राप्त |
| ४ | श्री. संदीप भोजराज शेंडे, कनिष्ठ लेखापाल | २३३३५०० | ६४-२३.०३.२०२३ | अप्राप्त | प्राप्त | प्राप्त | प्राप्त |
| ५ | श्री. अमोल मनोहर भजगवळे, कनिष्ठ लेखापाल | १९३३००० | ६५-२३.०३.२०२३ | अप्राप्त | प्राप्त | प्राप्त | प्राप्त |
| ६ | श्री. संतोष बाबुराव कवाणकर, कनिष्ठ लेखापाल | २१९३००० | २५१-३१.०३.२०२३ | अप्राप्त | अप्राप्त | अप्राप्त | अप्राप्त |
| ७ | श्रीम. अश्लेषा शामराव जाधव, लेखा अधिकारी | ४०२९५०० | ६१-२३.०३.२०२३ | अप्राप्त | अप्राप्त | अप्राप्त | अप्राप्त |
| ८ | श्री. सुजित मधुकर देवकर, कोषागार अधिकारी | ५४२१००० | ६२-२३.०३.२०२३ | अप्राप्त | अप्राप्त | अप्राप्त | अप्राप्त |
| ९ | श्री. विठ्ठल लक्ष्मण ढोकळ, उपलेखापाल | २४६०००० | २४-०८.०३.२०२३ | अप्राप्त | अप्राप्त | अप्राप्त | अप्राप्त |
| १० | श्रीम. रोहिणी दिनेश शिंदे, सहाय्यक लेखा अधिकारी | २५००००० | १२-०२.११.२०२२ | अप्राप्त | अप्राप्त | प्राप्त | अप्राप्त |
| ११ | श्रीम. सरिता सुधाकर मोरे, लघु-टंकलेखक | २६०६००० | ११-११.१०.२०२२ | प्राप्त | अप्राप्त | प्राप्त | प्राप्त |

| अ. क्र. | अग्रिमधारकाचे नाव / अग्रिम मंजूरी आदेशात नमूद पदनाम | मंजूर अग्रिम | प्रमाणक क्रमांक व दिनांक | उपयोगिता प्रमाणपत्र | वित्तिय संस्थेचे ना-देय प्रमाणपत्र | विमा पॉलिसी | गहाणखत |
|---|---|---|---|---|---|---|---|
| घरबांधणी अग्रिम मंजूर झालेले अग्रिमधारक (२०२३-२०२४) | | | | | | | |
| १ | श्रीम. निता रविंद्र नागरे, सहायक लेखा अधिकारी | ३५५०००० | १४-१०.०७.२०२३ | अप्राप्त | अप्राप्त | अप्राप्त | अप्राप्त |
| २ | श्री. सुदर्शन अशोक कुंभार, कनिष्ठ लेखापाल | २११४५०० | ३०-२७.०६.२०२३ | प्राप्त | प्राप्त | अप्राप्त | प्राप्त |
| ३ | श्री. ओंकार सूर्यकांत शेंडे, सहायक लेखा अधिकारी | २०२६००० | ३२-२७.०६.२०२३ | प्राप्त | प्राप्त | प्राप्त | अप्राप्त |
| ४ | श्री. भगवत प्रशांत कपाळे, सहायक लेखा अधिकारी | २२९०००० | १३-१०.०७.२०२३ | अप्राप्त | प्राप्त | अप्राप्त | प्राप्त |
| ५ | श्रीम. शितल नितीन दंदे, लिपिक टंकलेखक | २४९९५०० | ०४-०४.१०.२०२३ | अप्राप्त | अप्राप्त | अप्राप्त | अप्राप्त |
| ६ | श्रीम. अपूर्वा अंकुश जाधव, कनिष्ठ लेखापाल | २०८०००० | १०-०४.१०.२०२३ | अप्राप्त | अप्राप्त | अप्राप्त | अप्राप्त |
| ७ | श्री. दिपक सुर्यकांत वोडके, सहाय्यक संचालक | ५१३८००० | ३८-२६.१०.२०२३ | अप्राप्त | अप्राप्त | अप्राप्त | अप्राप्त |